नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १३८ | Issue - 138 | वार शुक्रवार दि. ४ ऑक्टोबर २०२४ | Blow- Friday Date 4 October 2024 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

## युनेस्कोच्या पथकाकडून किल्ले रायगडाची पाहणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अलिबाग : युनेस्कोच्या पथकाकडून आज किल्ले रायगडाची पहाणी करण्यात आली. जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेशासाठी नामांकनाच्या मूल्यांकन प्रक्रियेचा एक भाग म्हणून ही पहाणी करण्यात आली. या पथकामध्ये आंतरराष्ट्रीय तज्ञ हेवान्ग ली, सह संचालक जागतिक वारसा (ए एस आय)मदन सिंग चौहान, महाराष्ट्र शासन पुरातत्व विभाग संचालक सुजित उगले, उपसंचालक हेमंत दळवी, डॉ शुभा मजुमदार यांचा समावेश होता.

या पथकाने कुशावर्त तलाव, होळीचा माळ, जगदीश्वर मंदिर, बाजारपेठ, छत्रपती शिवाजी महाराज समाधी, हत्तीखाना, भवानी मंदिर आणि टोक, टकमक टोक, या महत्त्वपूर्ण ठिकाणासह विविध ऐतिहासिक खुणांना भेट दिली. या पथकाने किल्ल्याचा इतिहास आणि सद्यस्थितीबद्दल उपस्थित अधिकाऱ्यांकडून तपशीलवार माहिती घेतली. जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या सोबत झालेल्या चर्चे दरम्यान त्यांनी किल्ल्यातील हवामान, वनस्पती आणि इतर संबंधित पर्यावरणीय घटकांवर चर्चा केली. तसेच या किल्ल्याच्या संवर्धनासाठी रायगड जिल्हाप्रशासनाने घेतलेले निर्णय, सुरु असलेली कार्यवाही तसेच पर्यटन विकासासाठी केलेल्या उपाययोजना याबाबत माहिती घेतली. युनेस्को (पान २ वर...)

## मराठीसह पाच भाषांना अभिजात दर्जा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : मराठी भाषेला अभिजात भाषेजा दर्जा द्यावा, अशी मागणी महाराष्ट्रातील जनता गेल्या अनेक दशकांपासून करत आली आहे. आजवरच्या अनेक राज्य सरकारांनी देखील ही मागणी लावून धरली होती. अखेर केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजाद दर्जा देण्याच्या प्रस्तावास मंजुरी दिली आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबतची घोषणा केली आहे. मराठीसह एकूण पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला आहे. मराठीबरोबरच पाली, प्राकृत, आसामी व बंगाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे.

### केंद्र सरकारचा मोठा निर्णय

दरम्यान, केंद्र सरकारच्या या घोषणेनंतर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत एक पोस्ट एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर केली आहे. यामध्ये त्यांनी म्हटलं आहे की आजचा दिवस मायमराठीच्या इतिहासातील एक ऐतिहासिक दिवस!

फडणवीस यांनी म्हटलं आहे की मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याचा निर्णय आज केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला. मी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय मंत्रिमंडळातील सर्व मंत्र्यांचे महाराष्ट्रातील १२ कोटी जनतेच्या वतीने अतिशय मनापासून आभार मानतो. हा दिवस उजाडावा, यासाठी मी मुख्यमंत्री असताना आणि आताही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वाखाली सातत्याने पाठपुरावा केला. लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी, विवेकसिंधू अशा अनेक ग्रंथाचा आधार घेत मराठी भाषा ही अभिजातच आहे, हे सिद्ध करण्यासाठी अनेक थोरा-मोठ्यांचे, अभ्यासकांचे यासाठी हातभार लागले आहेत. मी त्यांचाही अत्यंत आभारी आहे. अखेर आज तो सुदिन अवतरला.




उपमुख्यमंत्री म्हणाले, नवरात्रीच्या पहिल्या दिवशी मायमराठीचा हा बहुमान मनाला अतिशय सुखद अनुभूती देणारा आहे. महाराष्ट्रातील आणि जगभरातील तमाम मराठीजनांचे मी अतिशय मनापासून अभिनंदन करतो. मराठी भाषेच्या सर्वांगिण विकासासाठी आता अनुदानासह केंद्र सरकारच्या पातळीवरसुद्धा सर्व ते सहकार्य मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

**आतापर्यंत तमिळ, संस्कृत, मल्याळम, तेलुगू, कन्नड आणि ओडिया या सहा भाषांना हा दर्जा मिळाला होता. त्यात आता मराठी, बंगाली, पाली, प्राकृत व आसामी भाषेचा समावेश झाला आहे.**

## थोडक्यात

### पुणे- सोलापूर इंदापूर बाह्यवळण महामार्गवर डिझेल चोरांचा सुळसुळाट

प्रतिनिधी/इंदापूर : पुणे -सोलापूर महामार्गवर इंदापूर तालुक्याच्या हद्दीत डिझेल चोरी करणाऱ्या टोळीचा सुळसुळाट झालेला पाहायला मिळत आहे. रात्रंदिवस ड्रायव्हींग करुन विश्रांती घेण्यासाठी हॉटेल किंवा रोडच्या कडेला आपले वाहन लावून हे ड्रायव्हर विश्रांती घेत असतात. गाडीचे ड्रायव्हर हे बऱ्याच वेळा एकटे असतात याचाच हे भुरटे चोर फायदा घेत आहेत . ड्रायव्हर बांधव हे दिवस रात्र ड्रायव्हिंग करुन थोडीशी विश्रांती घेण्यासाठी थांबले आसता ते झोपले असल्याची खात्री करून चालकाचे पैसे व मोबाईल घेऊन व डिझेल चोरी करून ही टोळी फरार होत आहे. चालक बाहेरच्या राज्यातील किंवा परगावचे असल्यामुळे पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करत नाहीत याचाच हे चोर फायदा घेत आहेत पुणे सोलापूर हायवेवर या भुरट्या चोरांनी उच्छाद मांडला आहे . दिनांक १ एक ऑक्टोबर रोजी पुणे सोलापूर महामार्गवर हॉटेलच्या सुरक्षारक्षाने चोरांना हटकल्याने चोरांनी डिझेल रस्तावर ओतुन पळुन गेल्याचे आढळून आले आहेत. पोलीस प्रशासनाने व महामार्ग सुरक्षा रक्षकांनी रात्री १२ ते पहाटे ५ पर्यंत गस्त वाढवावे अशी भावना चालक हॉटेल मालक व नागरिक यांनी व्यक्त केली आहे.

## हरियाणात निवडणूक प्रचाराची सांगता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : हरियाणाच्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची गुरुवारी सांगता झाली असून ९० जागांसाठी ५ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे.

प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यामध्ये राहुल गांधी यांनी सलग तीन दिवस 'संकल्प यात्रे'तून लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. तर, भाजपचा भर मोदी-शहा, राजनाथ-नड्डा आणि योगी आदित्यनाथ आदी प्रमुख नेत्यांच्या जनसभांवर राहिला. यावेळी सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळवण्याचे मोठे आव्हान भाजपसमोर असेल.

यंदाच्या निवडणुकीत हरियाणात प्रमुख जाट समूह काँग्रेसच्या बाजूने एकवटल्याचे दिसत असून मुस्लीम व दलित मतांच्या पाठिंब्यावर भाजपचा पराभव करण्याची रणनिती काँग्रेसने आखली आहे. काँग्रेसने २६ जाट, २० ओबीसी, १७ दलित, ११ पंजाबी हिंदू तसेच शीख, ६ ब्राह्मण, ५ मुस्लीम, २ बनिया व राजपूत, बिश्नोई व रोर समाजातील प्रत्येकी एकाला उमेदवारी दिली आहे. भाजपने २१ ओबीसी, १७ जाट, ११ ब्राह्मण, ११ पंजाबी हिंदू, ५ बनिया व २ मुस्लिमांना उमेदवारी दिली आहे.

## सांगलीत जोरदार पाऊस; पिकांचे नुकसान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगली : गुरुवारी सायंकाळी विजेच्या कडकडाटासह आलेला हस्ताचा पाऊस नवरात्रीच्या माळेत सापडला. यामुळे आता दहा दिवस पावसाचा मुक्काम असल्याच्या शक्यतेने द्राक्ष बागायतदारांबरोबरच काढणीला आलेल्या खरीप पिकांचे काय होणार याची धास्ती लागली आहे. आज सायंकाळी विजेच्या गडगडाटासह जोरदार पाऊस झाला. हस्त नक्षत्र सुरू होऊन आठ दिवस झाले. मात्र, आजपासून नवरात्र सुरू झाल्याने हस्त नक्षत्राचा पाऊस नवरात्रीच्या माळेत सापडल्याची धारणा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची आहे. यामुळे दसरा संपेपर्यंत पावसाचा मुक्काम राहणार असल्याचे मानले जाते. दरम्यान, काल सायंकाळी मणेराजुरी (ता. तासगाव) येथे पावसाबरोबर गारपीटही झाली. या भागातील द्राक्ष बागांच्या काड्या व फुटलेले कोंब मोडले. गारांच्या माऱ्याने पाने फाटत त्याची चाळण झाली. तर वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसाने काढणीला आलेले सोयाबीन, मका ही पिके जमीनदोस्त झाली. तासगाव तालुक्यातील लोढे, कौलगे, सावर्डे, चिंचणी, मनेराजुरी, खुजगाव, वाघापूर, आरवडे, बस्तवडे तुरची, राजापूर यांसह तालुक्यातील ग्रामीण भागाला पावसाने झोडपले. अर्ध्या तासात मणेराजुरी परिसरात ३६.५ मिलीमीटर पाऊस झाला. मुसळधार पावसापूर्वी दहा मिनिटे गारांचा तडाखा बसला. या गारांमुळे फळ छाटणी केलेल्या द्राक्ष बागांचे नुकसान झाले. डोळे फुगलेल्या व फुटत असलेल्या द्राक्ष बागांच्या काड्यांचे डोळे गारांच्या माऱ्याने मोडून पडले.

## 'स्वातंत्र्यानंतरही आपण तुरुंगातील जातीभेद हटवू शकलो नाही'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : भारतातील कारागृहात जातीवर आधारित भेदभाव होत असल्याबाबत खंत व्यक्त करून सर्वोच्च न्यायालयाने आज ऐतिहासिक असा निर्णय दिला. कैद्यांच्या जातीवर आधारित भेदभाव कारागृहात करण्यात येऊ नये, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. भारतातील सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांनी तीन महिन्यांमध्ये कारागृह नियमावलीत सुधारणा करावी, असेही निर्देश देण्यात आले आहेत. भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाली, तरीही आपण जातीभेदाचे निर्मूलन करू शकलो नाहीत, याबद्दलही न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. पत्रकार सुकन्या शांता यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड, न्या. जेबी पारडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड सदर सुनावणीदरम्यान म्हणाले, स्वातंत्र्याच्या ७५ वर्षात जातीवर आधारित भेदभावासारखी दृष्ट प्रथा आपण संपवू शकलेलो नाहीत. देशातील सर्व नागरिकांना न्याय आणि समानता प्राप्त करून देईल, असे राष्ट्रीय ध्येय आपल्याला डोळ्यासमोर ठेवावे लागेल. संविधान सभेत केलेल्या शेवटच्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या भविष्याबाबत ज्या चिंता व्यक्त केल्या होत्या, त्या आजही खऱ्या ठरत आहते, असेही सर्वोच्च न्यायालयाने यावेळी म्हटले.

### सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी व्यक्त केली खंत

याचिकाकर्त्या सुकन्या शांता म्हणाल्या की, उत्तर प्रदेश, तमिळनाडू, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल यांच्यासह ११ राज्यातील कारागृहात कैद्यांना त्यांच्या जातीवर आधारित काम दिले जाते. त्यांच्या राहण्याची व्यवस्थाही जातीनुसार ठरते. अनेक राज्यातील कारागृह नियमावलीत जातीवर आधारित भेदभावाचा उल्लेख आहे. जेवण बनविण्याचे काम उच्च जातीमधील कैद्यांना दिले जाते. स्वच्छतेचे काम खालच्या जातीमधील कैद्यांना दिले जाते. तर काही जातींचा गुन्हे करणाऱ्या जाती म्हणून उल्लेख करण्यात आला आहे.

सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण विषय याचिकेच्या माध्यमातून पुढे आणल्याबद्दल याचिकाकर्त्यांचे आभार व्यक्त केले. खंडपीठाने म्हटले की, संविधानाने सर्वांना समानतेचा अधिकार दिला आहे. अनुच्छेद १७ मध्ये अस्पृश्यतेवर बंदी घालण्यात आली आहे. तर अनुच्छेद २१ नुसार सर्वांना सन्मानाने जगण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. सर्व कारागृहात याचे पालन झाले पाहीजे. कारागृहात कैद्यांच्या जातीवरून त्यांना विशिष्ट काम देणे किंवा त्यांची राहण्याची वेगळी व्यवस्था करणे, असे भेद राहता कामा नयेत. तुरुंगात कैद्यांच्या जातीवरून त्यांची ओळख होता कामा नये. कैद्याच्या जातीचा कॉलमच कारागृहात असता कामा नये.

## नवरात्र महोत्सव : श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरात फुलांची आरास



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : घटस्थापनेपासून नवरात्र महोत्सवास सुरवात होत आहे. या निमित्त रूक्मिणी मातेला पहाटे नित्यपुजेवेळेस ११ ब्रम्हवृंदाकडून पंचसुक्त पवमान अभिषेक करण्यात आला. तसेच मंदिरात आकर्षक व नयनरम्य फुलांची आरास करण्यात आली आहे. त्यासाठी गुलाब, आर्किट, झेंडू, कामिनी, गुलछडी इत्यादी प्रकारच्या १ ते दिड टन फुलांचा वापर करण्यात आला असून, सदरची फुलांची आरास पुणे येथील भाविक श्री राम जांभूळकर यांनी मोफत करून दिल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगीतले.

### विठ्ठलास अलंकार, रूक्मिणी मातेस पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान

तसेच दुपारी दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे प्रथम दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सुनावले

यूएससीआयआरएफ पक्षपाती संस्था आहे

## तुमच्या देशात चाललंय ते बघा, अमेरिकेच्या धार्मिक स्वातंत्र्याबाबतच्या अहवालावर भारताचा संताप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : अमेरिकन सरकारने नेमलेल्या आयोगाने (यूएस कमिशन ऑन इंटरनॅशनल रिलिजियस फ्रीडम - यूएससीआयआरएफ) आंतराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्यासंबंधीचा अहवाल नुकताच सादर केला आहे. मात्र, हा अहवाल पाहून भारताने संताप व्यक्त केला आहे. भारताने हा अहवाल ठामपणे नाकारला आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल याबाबत म्हणाले, हा अहवाल पूर्णपणे पक्षपाती व राजकीय अजेंड्याने प्रेरित आहे. तसेच, भारताविरोधात खोट्या तथ्यांवर आधारित अहवाल जारी करण्यापेक्षा अमेरिकेने त्यांच्या देशातील मानवी हक्कांच्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रीत करावं, असा सल्ला भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने अमेरिकेला दिला आहे.

यूएससीआयआरएफने सादर केलेल्या अहवालात भारताबाबत वेगवेगळे दावे करण्यात आले आहेत. याबाबत प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधिंनी रणधीर जयस्वाल यांना प्रश्न विचारले. त्यावर जयस्वाल म्हणाले, यूएससीआयआरएफच्या अहवालावर आमचं एक ठाम मत आहे. सर्वात पहिली गोष्ट म्हणजे ही एक पक्षपाती संस्था आहे. भारताविरुद्ध चुकीची माहिती पसरवणे हा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे आम्ही त्यांचा अहवाल ठामपणे नाकारत आहोत. दुर्दैवाने हा अहवाल यूएससीआयआरएफच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे.

रणधीर जयस्वाल म्हणाले, यूएससीआयआरएफ असे प्रयत्न वारंवार करत आहे. यामुळे या संस्थेचीच बदनामी होत आहे. अमेरिकेच्या या आयोगाने भारताच्या कारभारात ढवळाढवळ करण्याऐवजी त्यांच्या देशातील मानवाधिकारांशी संबंधित समस्या सोडवायला हव्यात.

### तुमच्या समस्या सोडवण्यासाठी ऊर्जा वापरा; भारताचा अमेरिकेला सल्ला

**भारताने या अहवालावर म्हटलं आहे की यूएससीआयआरएफसारख्या संस्थांनी अमेरिकेत काय चाललंय ते आधी पाहावं. त्यांच्या देशात मानवाधिकारांसंबंधीच्या स्थितींकडे लक्ष द्यावं. अमेरिकेत अलीकडच्या काही वर्षांमध्ये वर्णभेद, वांशिक भेदभावाच्या अनेक घटना घडल्या आहेत. पोलिसांकडून होणारा भेदभाव, सामाजिक व आर्थिक असमानतेशी संबंधित अनेक समस्या उद्भवल्या आहेत. अशा स्थितीत यूएससीआयआरएफने इतर देशांविरुद्ध पक्षपाती अहवाल तयार करण्यावर नव्हे तर स्वतःच्या देशातील समस्या सोडवण्याकडे लक्ष द्यावं, त्यावर आपली ऊर्जा खर्च करावी.**

## संपादकीय....

### मायमराठीचा बहुमान

नवरात्रीच्या पहिल्या दिवशी मायमराठीचा हा बहुमान मनाला अतिशय सुखद अनुभूती देणारा आहे. मराठी भाषेच्या सर्वांगिण विकासासाठी आता अनुदानासह केंद्र सरकारच्या पातळीवरसुद्धा सर्व ते सहकार्य मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नुकतेच फडणवीस यांनी म्हटलं आहे की मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याचा निर्णय आज केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला. मी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय मंत्रिमंडळातील सर्व मंत्र्यांचे महाराष्ट्रातील १२ कोटी जनतेच्या वतीने अतिशय मनापासून आभार मानतो. हा दिवस उजाडावा, यासाठी मी मुख्यमंत्री असताना आणि आताही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वाखाली सातत्याने पाठपुरावा केला. लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी, विवेकसिंधू अशा अनेक ग्रंथाचा आधार घेत मराठी भाषा ही अभिजातच आहे, हे सिद्ध करण्यासाठी अनेक थोरा-मोठ्यांचे, अभ्यासकांचे यासाठी हातभार लागले आहेत. मी त्यांचाही अत्यंत आभारी आहे. अखेर आज तो सुदिन अवतरला. मराठी भाषेला अभिजात भाषेजा दर्जा द्यावा, अशी मागणी महाराष्ट्रातील जनता गेल्या अनेक दशकांपासून करत आली आहे. आजवरच्या अनेक राज्य सरकारांनी देखील ही मागणी लावून धरली होती. अखेर केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजाद दर्जा देण्याच्या प्रस्तावास मंजुरी दिली आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबतची घोषणा केली आहे. मराठीसह एकूण पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला आहे. मराठीबरोबरच पाली, प्राकृत, आसामी व बंगाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे.

# जगभर वाढता वंशवाद, हिंसा आणि द्वेष रोखण्यासाठी म. गांधीजींच्या शांती सदभावाचा मार्ग स्वीकारण्याची गरज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पाचगणी : जगभर अनेक धर्म बांधवांच्या मनामध्ये द्वेष आणि हिंसा ही निर्माण करून आधुनिक भांडवलशाही व वंशवादी एकत्रित येऊन गांधी वादाला विरोध करत आहेत यावर मात करण्यासाठी स्वातंत्र्योत्तर काळातील सर्व पिढ्यांनी नवा पिढ्यांच्यासाठी सतत गांधी विचाराचा जागर शांति सदभावाची आवश्यकता आणि हीच राष्ट्रीय एकात्मता हे गांधीजींचे निरंतर चे स्वप्न होते असा विचार प्रत्येक कृतीतून रुजवण्याची नितांत गरज असल्याचे सूर पाचगणी येथील महात्मा गांधी स्मारक समितीच्या वतीने आयोजित शांति सद्भाव वर्तमान व जागतिक संदर्भ या विषयावरील परिसंवादातील चर्चेमध्ये सहभाग घेताना सर्व वक्त्यांनी या विषयाची आवश्यकता नमूद केली.

याबाबतचे वृत्त असे की पाचगणी नगरपरिषद पाचगणी पत्रकार संघ व जिल्हा महात्मा गांधी स्मारक समिती यांच्या वतीने सद्भावना पुरस्कार जतिन देसाई मॅप्रो उद्योग समूहाचे मयूर होरा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला या कार्यक्रमानंतर भाग दोन मध्ये परिसंवादाच्या आयोजन केले होते या परिसंवादाचे बीजभाषण यातील देसाई यांनी केले जतिन देसाई म्हणाले की भारतीय स्वातंत्र्यलढा ही एक गंगा जमुना तजवीज आहे सांची विरासततेची संस्कृती आहे सरहद्द गांधी हा आपला मोठा वारसा आहे हा वारसाच पश्चिम आशियाई राष्ट्रांच्या मध्ये सर्वत्र पोहोचवला पाहिजे यासाठी अनुयुद्ध च्या भीती खाली सगळे जग वावरते आहे जगाचा अजून एक उत्तर प्रवास वैज्ञानिक प्रवास हा हिंसेच्या जवळ चालला आहे हा रोखायचा असेल तर जगातील अनेक राष्ट्रांनी नेल्सन मंडेला मलाला मार्टिन ल्युथर किंग आईन्स्टाईन या सर्वांनी गांधींचा मार्ग स्वीकारल्याशिवाय जगाला पुढे जाता येणार नाही हे अनेक वेळा सांगितले आहे याचे महत्त्व भारतीयांनी ओळखून सरहद्द गांधी ही गांधी विचाराची महान व्यक्तिमत्व स्वातंत्र्यलढ्यामध्ये जी होती आणि आहेत त्यांचा विचार जागर शांती सदभावासाठी पुन्हा पुन्हा करण्याची गरज आहे यासाठी जगातील अशांततेचे वर्तमान आणि नको


## परिसंवादातील सर्व व्याख्यात्यांचे एकमत

इतकी शांती सदभावाची गरज निर्माण झाली आहे द्वेष धर्मद्वेष हे यावर उपाय नाहीत भारतातील सद्भावाचा विचार संपवू पाहणाऱ्या सगळ्या प्रवृत्ती आणि संघटनांच्या विरुद्ध शांतता प्रेमी गांधी प्रेमी नागरिकांना निर्भयतेने जागर करावा लागेल असेही या ठिकाणी जतिन देसाई यांनी आपल्या विजय भाषणात सांगितले.

परिसंवादातील महाराष्ट्राचे उपसंपादक समीर मणियार यांनी सांगितले की महाराष्ट्र अशांत करण्याचे राजकारण्यांच्या मदतीतून चाललेले प्रयत्न हाणून पाडले पाहिजे शांती सद्भाव निर्माण करण्यात आपण सर्व कमी पडलो आहोत द्वेष वाढवला जातो आहे जाती धर्मांच्या संघर्षाची बीजे पेरली जात आहेत ही ओळखून परिवर्तन वाद्यांना काम करावे लागेल सत्तेवर असलेले लोक माध्यमातून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा हा समाज विघटित करतो आहे या देशातील शांततेचा वारसा ऐक्याचा वारसा नष्ट करून सत्तेची लूट चालवली जाते आहे हे भारतातील देशीय शांतीसत्वाचे विषन्न करणारे वातावरण आहे वर्तमान आहे असे नमूद करून मणियार म्हणाले की तंत्रज्ञानाची लाभार्थी असलेली आधुनिक पिढी ही गांधी समजावून घेणारी आहे तिच्यापर्यंत पोहोचण्यासाठी परिवर्तनवादी गांधीवादी हे कमी पडतात नव्या कल्पना नव्या माध्यमातून गांधी जनतेपर्यंत पोहोचवला पाहिजे तरच व्यक्तीच्या मनात व विचारात पेरला जाणारा द्वेष हा अनुयुद्धापेक्षा वाईट आहे हे ओळखून काम करण्याची नितांत गरज आहे ज् तीन देसाई यांनी आपल्या पत्रकारितेत हा वृत्त धर्म सांभाळल्याचे चाळीस वर्षात आम्ही अनुभवले आहे अशा ज्येष्ठ पत्रकाराला शांतीसत्वाचा पुरस्कार देऊन गांधीयन पत्रकारिता ही समोर आणली जात आहे याचे या परिसंवादात महत्त्व प्रतीत होते असेही समीर यांनी याप्रसंगी सांगितले.

विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे संस्थापक सुबोध मोरे आपल्या भाषणात म्हणाले की ठोकळेबंद प्रचाराचे मार्ग बंद करून कला नाटक चित्रपट पथनाट्य चित्रकला या माध्यमातून गांधी विचार शिक्षण क्षेत्रात सर्व दूर पोहोचवला पाहिजे गांधी विचार ही मक्तेदारी नाही हा जीवनाचा प्रयोग वाद आहे हे भारताच्या समाज जीवनाचे गरजेचे सर्वांना आवश्यक असणारे वर्तन आहे हे ओळखून शांती सद्भाव निर्माण कार्यात आपापले सर्व मतभेद बाजूला ठेवून गांधी हा समान विचाराचा धागा या देशाला आता आवश्यक आहे या मार्गावरून या विचारावरून चालत राहिले तरच या देशातील जातीय ध्रुवीकरण धर्मीय ध्रुवीकरण रोखता येईल आणि स्वातंत्र्याच्या चळवळीतून वारसा म्हणून दिलेला हिंदू मुस्लिम ऐक्याचा वारसा चालवता येईल असेही सुबोध मोरे यांनी आपल्या भाषणात सांगितले.

प्रबोधन ज्योती मासिकाचे संपादक पत्रकार प्रसाद कुलकर्णी यांनी घनाघाती भाषणात सांगितले की उघड उघड मुलतत्ववाद्यांना सनातन वाद्यांना



आव्हान देण्याची गरज आहे गांधी सनातनवादी नव्हते गांधी हिंदू होते असे म्हणत होते पण गांधींचा धार्मिक वाद हिंदूवाद हा आहिंसक सत्य आचरणाचा होता गांधी आयुष्यात देवळात जाऊन धर्मश्रद्धेचे अवडंबर करीत नव्हते ते धर्म विरोधी नव्हते समजावून घेण्याची नितांत गरज आहे गांधी ही राष्ट्र एकात्मतेची शक्ती आहे गांधींना समाज मनातून दृष्टी पटलापासून दूर करण्याचे हेतू द्वेष पसरवणे शत्रुत्व वाढवणे आणि दंगली घडवणे हे आहेत हे समजावून घेऊन गांधी हाच द्वेष मनातील नाहीसा करणारा शांतिदूत आपणाला स्वीकारावा लागेल गांधी सदोदित सांगावा लागेल गांधी हीच शांती आहे गांधी हीच सत्य वर्तनाची ग्वाही आहे गांधी हाच सद्भावाचा मार्ग आहे असेही प्रसाद कुलकर्णी यांनी अत्यंत घनाघाती भाषणात विचार नमूद केले.

महात्मा गांधी स्मारक समितीचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार शिवाजी राऊत परिसंवादात म्हणाले की जगभर भविष्याच्या अधिकार पृथ्वीच्या आणि मानव जातीचे जपून ठेवण्यासाठी त्या आबादीत राहण्यासाठी विचार चालू आहे भारतात मात्र द्वेष आणि हिंसा ही मनामनात पोहोचवण्याचे प्रयत्न सत्ताधारी हिंदुत्ववादी शक्ती करीत आहेत याला विरोध करण्यासाठी गांधीजींचा निर्भय मार्ग गांधीजींचा सत्याचा मार्ग गांधीजींचा हिंदू मुस्लिम ऐक्याचा मार्ग ही हिंसा आणि द्वेष नाहीशी करण्यासाठीची अत्यंत आवश्यकता असलेली मूल्य आहेत जगाला वंशवाद व हिंसा यापासून वाचवण्यासाठी भांडवलशाही उपयोगी पडणार नाही तर गांधींचा अहिंसेचा मार्ग हाच मार्ग स्वीकारावा लागणार आहे या देशातील वरिष्ठ जाती आणि वर्ग यांनी समग्र गांधी स्वीकारला नाही गांधी विचाराचरोपण रोपण केले नाही गांधीजींचे हिंदूकरण करण्याचे प्रयत्न चालू आहेत गांधींना भारतीय नागरिकांच्या मनपटलावरून हटवण्याचे प्रयत्न चालू आहेत गांधीजींचे मामुलीकरण चालू आहे हे सर्व रोखण्यासाठी प्रत्येक नागरिकांनी क्षणाक्षणाला गांधी विचार कथन करणे वर्तन करणे हाच शांति सद्भाव निर्माणचा प्रयत्न स्वतः पासून तयार करण्याची आवश्यकता आहे भारतीय जनभूमीवर आज गांधी हीच अंतिम हाक आहे ही ऐकण्यासाठी अश्या हाका मारण्यासाठी पाचगणी येथील महात्मा गांधींच्या अभिवादनाचा जयंतीचा सोहळा जिल्हा महात्मा गांधी स्मारक समिती सातत्याने गेली वीस वर्षे करते आहे त्याचाच भाग म्हणून हा परिसंवाद समकाळाच्या अस्वस्थतेवर विचार करण्यासाठी आयोजित केला आहे असे हे राऊत यांनी शेवटी सांगितले.

तरी संवादातील मान्यवर वक्ते यांचा गौरव जिल्हा स्मारक समितीच्या वतीने गौरव चिन्ह देऊन भारत पुरोहित विक्रांत पवार रवी बेलोसे सचिन भिलारे गणेश गोळे या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

परिसंवादाचे सूत्रसंचालन महात्मा गांधी स्मारक समितीचे सचिव कॉम्रेड अस्लम तडसरकर यांनी केले.

## बैलपोळा सणानिमित्त शेतकरी बांधवांनी आमदार दत्तात्रय भरणे यांच्या प्रति व्यक्त केली कृतज्ञता



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : बैलपोळा सणाच्या निमित्ताने शेतकरी बांधवांनी आमदार दत्तात्रय ( मामा) भरणे यांनी केलेल्या विकास कामांची पोचपावती देत प्रेमाने सर्जा राजाच्या सजावटीतून कृतज्ञता दाखवली. लाकडी निंबोडी उपसा सिंचन योजना ही इंदापूर तालुक्याच्या जिव्हाळ्याचा विषय आमदार दत्तात्रय मामा भरणे यांच्या पाठपुराव्याने या योजनेस मंजुरी मिळवून प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे. या कामाच्या प्रति शेतकऱ्यांनी ऋण व्यक्त केले.

यावर आमदार दत्तात्रय भरणे यांनी आनंद व्यक्त करत शेतकरी बांधवांच्या चेहऱ्यावरील आनंदाचा आणि त्यांच्या आयुष्याच्या विकासाचा एक छोटासा भाग होणे हे मोठे भाग्य आहे असे म्हणणे आहे.

## युनेस्कोच्या पथकाकडून किल्ले रायगडाची पाहणी

(पान १ वरून..) टीमने देखील देखभाल आणि संवर्धनासाठी संभाव्य सुधारणांबद्दल त्यांची मते मांडली. भेटीदरम्यान, शिष्टमंडळाने स्थानिक प्रतिनिधी आणि गावकऱ्यांशी देखील संवाद साधला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ गड किल्ल्यांचा जागतिक वारसा यादीत समावेश व्हावा यासाठी राज्यसरकारने प्रस्ताव पाठवला होता. यात रायगड किल्ल्यासह, खांदेरी, विजयदुर्ग, सुवर्णदूर्ग, जिंजी, प्रतापगड, पन्हाळा, लोहगड, शिवनेरी, साल्हेर, सिंधदूर्ग आणि राजगड या किल्लयांचा समावेश आहे. त्यानुसार युनेस्कोच्या पथकाकडून या किल्लयांची पहाणी केली जाणार आहे. वारसाशी जोडलेल्या १२ निवडक किल्लयांपैकी स्वराज्याची राजधानी असलेला हा रायगड किल्ला जागतिक स्तरावर ओळखण्यासाठी विचाराधीन आहे. या समावेशामुळे रायगड किल्लयाला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा मिळेल आणि जागतिक पर्यटक आकर्षित होतील,स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल तसेच पर्यटनाला चालना मिळेल असा विश्वास जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी यावेळी व्यक्त केला.

## वागदरी येथे महात्मा गांधी जयंती निमित्त ग्रामस्वच्छता आणि मोफत आरोग्य तपासणी व प्रथमोपचार शिबिर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड) : तुळजापूर तालुक्यातील वागदरी येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान कै.लाबहादूर शास्त्री यांची जयंती विविध उपक्रमाने साजरी करण्यात आली असून या निमित्ताने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय धाराशिव व वात्सल्य सामाजिक संस्था नळदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वागदरी येथे मोफत आरोग्य तपासणी व प्रथमोपचार शिबिर घेण्यात आले.



प्रारंभी ग्रामदैवत श्री संत भवानसिंग महाराज यांच्या मंदीर परिसरात महात्मा गांधी जयंती निमित्त स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. त्यानंतर येथील जि.प.प्राथमिक शाळा वागदरी येथे सरपंच तेजाबाई शिवाजी मिटकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय धाराशिव व वात्सल्य सामाजिक संस्था नळदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी व प्रथमोपचार शिबिर घेण्यात आले.प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पूजन करून आरोग्य शिबीरस सुरुवात करण्यात आली.

या शिबिरात ८० रुग्णांची बिपी,सुगर सह आरोग्य तपासणी करून प्रथमोपचार करण्यात आले.यावेळी डॉ . यशवंत नरवडे, डॉ.अंजीली पाटील यांनी आरोग्य शिबीराचे काम पाहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपा गाव प्रमुख किशोर सूरवसे यांनी केले तर सुत्रसंचलन सहशिक्षक तानाजी लोहार यांनी केले.

या वेळी जेष्ठ कार्यकर्ते शिवाजी मिटकर गुरुजी, ज्ञानेश्वर पाटील,मदन पाटील, किशोर धुमाळ,एस. के.गायकवाड,बाळु पवार, नेताजी मांडजे, रामसिंग परिहार, अमोल परिवार, चंद्रकांत वाघमारे,पार्वती बिराजदार,पद्मनी पवार,रुपाली जाधव, मुख्याध्यापिका महादेवी जत्ते, संपदा मांडजे सह कार्यकर्ते उपस्थित होते.



## महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांना निफाड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : राष्ट्रपिता महात्मा गांधी व देशाचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची संयुक्त जयंती निफाड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने साजरी करण्यात आली.असुन यावेळी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस सेवा दलाचे प्रकाश अडसरे यांच्या हस्ते तर लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस तालुका काँग्रेस कमिटीचे तालुका अध्यक्ष विजय जाधव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

याप्रसंगी निफाड तालुका काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस सुहास सुरळीकर यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या विषयी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष मधुकर शेलार बाबासाहेब सोमवंशी,कांचनराज जाधव ,गणेश धोत्रे, हमीद शेख विशाल भुजबळ, वैभव निफाडकर, दत्ता गायकवाड, शामराव शिंदे, मधुसूदन आव्हाड ,नितीन बनसोडे संजय ठोंबरे,बालम सय्यद यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

## कैलास अर्जुन नागरे यांना राज्यपालांच्या हस्ते ‘युवा शेतकरी’ पुरस्कार प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दिलीप वनवे / देऊळगाव राजा : शिवणी आरमाळ येथील युवा शेतकरी श्री कैलास अर्जुनराव नागरे यांनी शेतीत केलेल्या उत्पादन वाढीसाठी नावीन्यपूर्ण प्रयोगामुळे आणि शेतीतील विविध स्तुत्य उपक्रम आणि उल्लेखनीय कार्य केल्यामुळे त्यांचा २९ सप्टेंबर रोजी पुरोगामी महाराष्ट्रात आधुनिकयुवा शेतकरीम्हणून गौरव करण्यात आला.

### शिवणी आरमाळ गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा



महाराष्ट्र शासनाचा कृषी विभागाचा सन २०२० चां विभागीय सर्वोच्च युवा शेतकरी पुरस्कार महामहीम राज्यपाल श्री सी पी राधाकृष्णन यांचे हस्ते तर मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्री अजितदादा पवार, कृषिमंत्री श्री धनंजय मुंढे,कृषी सचिव जयश्री भोज, कृषी आयुक्त श्री रविंद्र बिंनवडे यांच्या उपस्थितीत सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम मधील नॅशनल स्पोर्टस् क्लब ऑफ इंडिया(डोम) वरळी,मुबंई येथे दिनांक २९ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी ठीक ६ वाजता कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले म्हणून सन २०२० चा पहिला सर्वोच्च युवा शेतकरीपुरस्कार अमरावती विभागातून त्यांना प्रदान करण्यात आला आणि सपत्नीक कुटुंबाचा सत्कार करण्यात आला.

हा पुरस्कार,हा सन्मान माझ्या एकट्याचा नसून मी समजतो माझ्या मते मातीत झिजलेल्या त्या सर्व खुरांचा,पायांचा, हातांचा, बौद्धिक, शारीरिक,मानसिक,श्रमाचा,मातीत शेतीत कष्ट उपसलेल्या त्या प्रत्येक घामाघूम चेहऱ्याचा, मातीत रात्रंदिन राबणाऱ्या त्या सर्व शेतमजूर,शेतकरी बंधू भगिनींचां शेती,माती,पाण्याशी निगडित सहकाऱ्यांचा, सल्लागारांचा, मार्गदर्शकांचा आणि सुख आणि दुःखात नेहमीच खांद्याला खांदा साथ देत जे मित्र मैत्रीण आणि नातेवाईक व आप्तेष्ट मंडळी सर्व पत्रकार बंधू न्यूज चॅनल प्रतिनिधी आणि माझे गाव तालुका जिल्हा विभाग आणि राज्याचा आहे हा पुरस्कार आणि सन्मान मी त्या सर्वांना समर्पित करीत आहे.



## ग्रामपंचायत गोगांव येथे गांधी जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट ( प्रतिनीधी ) ग्रामपंचायत गोगांव येथे महात्मा गांधी जयंती साजरी करण्यात आले यावेळी कार्यक्रम अध्यक्षस्थानी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे हे होते प्रतिमा पूजन अंगणवाडी सेविका तेजाबाई गुरव, भाग्यश्री सोनकवडे, आशा सेविका मधुमती. गायकवाड यांच्या हस्ते महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले यावेळी निवृत्ती सुरवसे, सुरेश सोनकांबळे, आकाश गायकवाड, रोहन जगताप यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### कर्ज फेडण्यासाठी चार लाख आण म्हणत जिवे मारण्याची धमकी; पतीसह आठ जणांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) कर्ज फेडण्यासाठी व घर घेण्यासाठी माहेरून चार लाख रुपये घेऊन ये म्हणत विवाहितेला शिवीगाळ करून जीवे ठार मारण्याची धमकी देऊन शारीरिक व मानसिक त्रास दिला.तसेच पती मोहिरोद्दीन याने पत्नीला तलाक ए हसन प्रमाणे तीन नोटीस पाठवून तलाक दिला असल्याची फिर्याद आदिबा मोहिरोद्दीन हरकारे (वय-२२,रा.साखरपेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती मोहिरोद्दीन,सासू फेरोजा,सासरे लियाकत,दिर जिशान,नणंद सुमय्या व नणंदेची पती मुजाहिद,फातीमा शेख,हलीमा शेख यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.हि घटना ९ जानेवारी २०२२ ते आजतागायत पर्यंत फिर्यादी यांच्या सासरी जवाहर नगर संत तुकाराम नगर सोलापूर येथे घडली. पोसई.तपास ढेरे हे करीत आहेत.

### पत्नीने-पतीचा नंबर ब्लॉक केल्याने दुचाकी जाळली

सोलापूर (प्रतिनिधी) पत्नीने-पतीचा नंबर ब्लॉक केल्याने पत्नीची दुचाकी जाळल्याप्रकरणी पतीविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याप्रकरणी गीतांजली गोपाल द्यावरकोंडा (वय-४२,रा.साहेबराम अपार्टमेंट चौथा मजला,दत्तनगर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाणे फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती गोपाळ रामकृष्ण धावरकोंडा (रा.रविवार पेठ,राजेंद्र चौक) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी गीतांजली या नेमचंद जैन आयुर्वेदिक रुग्णालय येथे डिलिव्हरी वार्ड येथे असताना त्यांचे पती गोपाळ हा तेथे येऊन तू माझा नंबर ब्लॉक केला.असे म्हणत दुचाकी मागितली.त्यावेळी पत्नीने दुचाकी देण्यास नकार दिला असता,गोपाळ याने पेट्रोलची बाटली दाखवत जाळून टाकतो अशी धमकी दिली.त्यावेळी फिर्यादी गीतांजली यांनी तेथील वॉचमनला सांगून गोपाळ याला बाहेर जाण्यास सांगितले असता,गोपाळ याने खाली गेल्यावर हॉस्पिटलच्या पार्किंगमध्ये लावलेली फिर्यादी यांच्या दुचाकीवर पेट्रोल टाकून जाळली व फिर्यादीस तुझी गाडी जशी जाळली आहे तसेच तुला पण मारून टाकतो असे म्हणाला.त्यानंतर तुला व तुझ्या बापाला रस्त्यावर आणून जाळल्याशिवाय गप्प बसणार नाही.यापुढे नोकरी कशी करते मी बघतो असे म्हणत दमदाटी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास पोलीस नाईक कामूर्ती हे करीत आहे.

# रामकृष्ण हरी....वाजवा तुतारी

## देवेंद्र फडणवीस व हर्षवर्धन पाटील यांची चर्चा निष्फळ ; इंदापूरातील कार्यकर्त्यांनी दिल्या घोषणा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे

देवेंद्र फडणवीस व हर्षवर्धन पाटील यांच्या सोबतची चर्चा निष्फळ ठरल्याने भाजप सोडणार असल्याचं निश्चित झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पश्चिम महाराष्ट्रातील भाजप नेते हर्षवर्धन पाटील हे त्यांच्या पक्षाला रामराम करणार आहेत. हर्षवर्धन पाटील भाजपची साथ सोडून शरद पवार गटात प्रवेश करणार आहेत.

**दरम्यान, पुणे जिल्ह्यातील इंदापूर भागात भाद्रपद पोळा साजरा केला जातो. या दिवशी बैलांना सजवून गावातून मिरवणूक काढली जाते. सध्या इंदापुरात विधानसभा निवडणुकीचे वारे जोरात तापलंय. त्यातच इंदापुर तालुक्यातील भिगवणच्या हर्षवर्धन पाटील प्रेमी शाहरुख शेख या शेतकऱ्याने बैलपोळानिमित्त हर्षवर्धन पाटील २०२४ फिक्स आमदार, तुतारी वाजवणारा माणूस अशा आशयाचे चित्र रेखाटलंय. त्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.**

हर्षवर्धन पाटील यांची देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतची बैठक निष्फळ ठरली आहे. त्यामुळे हर्षवर्धन पाटील भाजप सोडणार असल्याचं निश्चित झाल्याचं बोललं जात आहे. गेल्या काही दिवसांपासून हर्षवर्धन पाटील हाती तुतारी घेणार असल्याच्या चर्चा होत्या. येत्या दोन ते तीन दिवसांत हर्षवर्धन पाटील शरद पवार गटात प्रवेश करणार आहेत. पुण्यात पक्षप्रवेश होण्याची दाट शक्यता आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. काय आहे इंदापुरातील राजकीय समीकरण? माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी २०१९ साली काँग्रेला राम राम करत भाजपमध्ये प्रवेश केला होता. पुढे राष्ट्रवादी फुटून अजित पवार गटाने महायुतीला साथ दिली.

त्यानंतर इंदापूर मतदारसंघातील राजकीय समीकरण बदललं. आमदार दत्तात्रय भरणे यांनी देखील अजित पवारांना सांगितलं. त्यामुळे इंदापूर मतदारसंघात महायुतीकडून कोणाला उमेदवारी मिळणार, याकडे साऱ्यांचे लक्ष लागलंय. याचदरम्यान, इंदापुरात भरणे यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळे हर्षवर्धन पाटील शरद पवार गटाकडून उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छुक आहेत.

# शहरात रोगराईचे थैमान स्वच्छतेबाबत नगरपरिषद बेईमान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मंगरुळपीर/प्रतिनिधी) : नगरपरिषद मंगरूळपीर येथे अस्वच्छतेचे साम्राज्य पसरलेले आहे. मुख्याधिकारी नसलेल्या नगर परिषदेमध्ये रोगराई तसेच अस्वच्छता सर्वत्र पसरली असून ग्रामीण रुग्णालय मंगरूळपीर येथे डेंग्यू मलेरियाच्या रुग्णांची संख्या सुद्धा वाढत आहे. अशात सामाजिक कार्यकर्ते इरफान शेख यांनी अनेक निवेदने देऊन सुद्धा शहरांमध्ये सर्वत्र धूर फवारणी होत नाही तसेच नाल्यांमध्ये घाण साचलेली आहे.

**इरफान शेख यांचा आरोप नगरपालिका कार्यालयासमोर मुंडन करत केला निषेध**

मात्र जनतेच्या निवेदनांना केराची टोपली दाखवणाऱ्या व ठेकेदारांच्या कामासाठी रात्री उशिरापर्यंत सुरू राहणाऱ्या मंगरूळपीर नगर परिषदेची एक वेगळीच अशी ओळख आहे.

त्यांच्या ढिसाळ धोरणाचा निषेध म्हणून सामाजिक कार्यकर्ते इरफान शेख यांनी नगरपरिषद कार्यालयासमोर दिनांक २ ऑक्टोबर रोजी गांधी जयंती च्या पर्वावर स्वतःचे मुंडन करून निषेध नोंदवला.




## नांदुर्डी येथून महिला बेपत्ता

निफाड/ प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील पिंपळगाव बसवंत येथील विवाहित महिला शितल लक्ष्मण ठाकरे वय २९ ही नांदुर्डी येथे बहिणीकडे आली असता मी सासरी जाते असे सांगून घरातून निघून गेली असून अद्याप पर्यंत ती पिंपळगाव येथे पोहोचली नाही ,अशी माहिती त्यांची बहीण उषा दौलत मध्ये रा. नांदुर्डी ता. निफाड यांनी निफाड पोलीस स्टेशनला दिली आहे. शितल लक्ष्मण ठाकरे वय २९ ह्या रंगाने गोऱ्या असून केस काळे कुरळे आहेत, उंची पाच फूट असून चेहरा उभा आहे, सदर महिलेच्या उजव्या हातावर मोराच्या पिसाचे गोंधनअसून डाव्या हातावर इंग्रजीमध्ये लक्ष्मण असे नाव गोंदलेले आहे अंगात पंजाबी ड्रेस असून कुणाच्या नजरेस पडल्यास निफाड पोलीस ठाण्यात संपर्क साधावा, पुढील तपास पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांचे मार्गदर्शनाखाली एस सी घोलप हे करीत आहे.

# जिल्हा परिषद शाळा गोगांव येथे गांधी जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट /प्रतिनीधी :

जिल्हा परिषद शाळा गोगांव येथे महात्मा गांधी जयंती साजरी करण्यात आले यावेळी कार्यक्रम अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुधीर जगताप हे होते प्रतिमा पूजन उपसरपंच कमलाकर सोनकांबळे निवृत्ती सुरवसे, आकाश गायकवाड यांच्या हस्ते महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले यावेळी मुख्याध्यापक फुडलिक वाघमारे, शंकर कारभारी , महादेव चव्हाण यासह ग्रामस्थ उपस्थित होते




## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या लोहा तालुकाध्यक्षपदी विशाल दिनेशराव घंटे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



लोहा/प्रतिनिधी : लोहा शहरातील उच्च विद्या विभूषित पत्रकार म्हणून परिचित असलेले आपल्या लेखणीच्या आधारावर समाजातील शोषित पिढीत व दिन दुबळे यांच्या प्रश्नावर न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करीत असलेले पत्रकार म्हणून ते काम करत असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून मास्टर ऑफ आर्ट ही पदवी पूर्ण केली व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातून बॅचलर ऑफ एज्युकेशन व बॅचलर ऑफ जर्नोलिझम पूर्ण केले. व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघात गेल्या अनेक दिवसापासून ते कार्यरत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे, राज्य संघटक संजय भोकरे, राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे, विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी यांच्या आदेशाने जिल्हाध्यक्ष संग्राम पाटील मोरे व निवड समिती जिल्हाध्यक्ष मोहन पाटील पवार यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन त्यांची लोहा तालुकाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुकाचा वर्षाव होत आहे

# एस बी देशमुख राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी



युवा ध्येय व युवा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्याचे मा . शिक्षण संचालक दिनकर टेमकर यांच्या हस्ते एस बी देशमुख यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक उत्तमराव कांबळे हे होते.

यावेळी प्रमुख वक्ते दिनेश आदलिंग लेखक , प्रमुख आकर्षण सिने अभिनेता रिशी जोरवर ,अरुण धामणे मा. शिक्षणाधिकारी अहमदनगर, परशुराम पावसे मा . शिक्षणाधिकारी अहमदनगर, संदीप वाघचौरे शिक्षण तज्ञ, श्रीकृष्ण कुलकर्णी भोसला मिलिटरी स्कूल . युवा ध्येय फाउंडेशनचे अध्यक्ष लहानु सदगीर हे उपस्थित होते एस बी देशमुख यांना शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल राज्यस्तरीय ध्येय आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार २०२४ देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ साहित्यिक उत्तमराव कांबळे यांनी म्हणाले की शिक्षण क्षेत्रात समस्यांना न शोधता पर्याय सुचवले पाहिजेत आणि हे पर्याय सुचविण्याचे काम मुख्याध्यापक प्रशासकीय अधिकारी म्हणून चांगले करत असतात म्हणून या पुरस्काराचे महत्त्व अनमोल आहे पुरस्काराने प्रेरणा मिळते आणि प्रेरणेतून राष्ट्र उभे राहते म्हणून पुरस्कार महत्त्वाचे आहेत हे पुरस्कार देताना कुठल्याही प्रकारचे प्रस्ताव न मागवता काम बघून हे पुरस्कार दिल्याचा सार्थ अभिमान आम्हा सगळ्यांना वाटतो.या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर व शिक्षक वर्ग ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जनतेची सेवा हाच आपल्या सामाजिक कार्याच उद्देश आहे : अण्णासाहेब दराडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



वागदरी/एस.के .गायकवाड : आपल्याला कसलाही राजकीय वारसा लाभला नसून एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात आपला जन्म झालेला आहे.केवळ सर्व सामान्य माणसाच्या न्याय हक्कासाठी, शेतकरी शेतमजूर महिला,युवक यांची सेवा करण्यासाठी जनतेची सेवा हाच एकमेव उद्देश समोर ठेवून आपण सामाजिक कार्यात सक्रिय आहे.आपल्या सामाजिक कार्याला राजकारणाची जोड देऊन आधीकाराने जनतेची सेवा करण्यासाठीच आगामी विधानसभा निवडणुकीत तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून अपक्ष म्हणून निवडणूक लढविणार असल्याचे मत सामाजिक कार्यकर्ते अण्णासाहेब दराडे यांनी नळदुर्ग ता. तुळजापूर येथे सत्कारा प्रसंगी बोलताना सांगितले. तुळजापूर तालुक्यातील हगलूर येथील सामाजिक युवा कार्यकर्ते अण्णासाहेब दराडे हे तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविणार असून निवडणुकीची पुर्व तयारी म्हणून सध्या गावभेटीवर भर दिला आहे.गावोगावीआपला परिवर्तन रथयात्रा घेऊन मतदारांच्या भेटी घेत आहेत.जनतेतून त्यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. आपला प्रचार दौरा करत असताना नळदुर्ग बसस्थानकाच्या प्रांगणात झाडाच्या सावलीत ग्रामीण भागातील प्रवासी बसची प्रतिक्षा करत असल्याचे त्यांनी पाहिले आणि कोणाची कसलीच मागणी नसताना नळदुर्ग बसस्थानकाच्या प्रांगणात प्रत्येक झाडाखाली प्रवासाना बसण्यासाठी सिमेंटचे बाकडे स्वखर्चाने वहातूक नियंत्रका मार्फत लोकार्पन केले.त्यानी केलेल्या या सामाजिक उपक्रमाबद्दल नळदुर्ग बसस्थानकाचे वहातुक नियंत्रक महेश डुकरे यांनी बसस्थानकातच छोटेखानी त्यांचा सत्कार केला.याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. याप्रसंगी रिपब्लिकन पक्षाचे बाबासाहेब बनसोडे, एस.के.गायकवाड,सेवा निवृत्त पोलिस हवालदार संदीपान वाघमारे, रामदास कांबळे , भारत यादगीरे,सह प्रवासी उपस्थित होते.

**पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल** — **कायदेशीर कारवाई करण्याची पत्रकार संघटनेची मागणी**

# पत्रकारांच्या बातमीवर व्हाट्सअप वर सार्वजनिकरित्या लाचखोरीचा आरोप करणे आंगलट येणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा / राहुल साबळे : ब्रेकिंग महाराष्ट्र हे महाराष्ट्रातील मराठी भाषेतील अधिकृत न्यूज पोर्टल असून, ते केंद्र सरकारकडे नोंदणीकृत आहे. मुंबई, नगर, व पुणे येथून राज्यभर प्रसारित होणाऱ्या दैनिकात पत्रकार अनिल दराडे हे सिंदखेडराजा व देऊळगाव राजा तालुका प्रतिनिधी म्हणून काम करीत आहेत सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघात आ. शिंगणेंनी सर्वच इच्छुकांची धाकधूक वाढवली!' या दिनांक २९ सप्टेंबर २०२४च्या बातमीवर डॉ. सुनील कायदे सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघ - २०२४' या व्हाटसअप ग्रुपवर ८०८०८ ६३५८५ या क्रमांवरून माझ्या पत्रकारितेच्या हेतूवर संशय घेणारी कॉमेन्ट करण्यात आली. एवढेच नाही तर संबंधित पत्रकाराने पाकिट घेऊन बातमी लिहिली असेल या अनुषंगाने पाकीट भेटलं असेल दुसरं काय, अशी पोस्ट केली, यामुळे मी किनगाव राजा पोलिस स्टेशन मध्ये तक्रार दाखल करून वरील मोबाईल नंबर धारकांनावर कठोर कारवाई करावी अशी मागणी पत्रकार यांनी केली आहे अनिल दराडे हे पूर्णवेळ पत्रकार असून, गेली ३० वर्षे पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत आहे.

भारतीय राज्यघटनेच्या कलम १९(१)(अ) अनुसार मला प्राप्त पत्रकारितेच्या अधिकारान्वये मी प्रकाशित केलेल्या सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघात आ. शिंगणेंनी सर्वच इच्छुकांची धाकधूक वाढवली!' या दिनांक २९ सप्टेंबर २०२४च्या बातमीवर डॉ. सुनील कायदे सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघ - २०२४' या व्हाटसअप ग्रुपवर ८०८०८ ६३५८५ या क्रमांवरून माझ्या पत्रकारितेच्या हेतूवर संशय घेणारी कॉमेन्ट करण्यात आली. एवढेच नाही तर संबंधित पत्रकाराने पाकिट घेऊन बातमी लिहिली असेल या अनुषंगाने पाकीट भेटलं असेल दुसरं काय, अशी पोस्ट केली, व माझ्यावर सार्वजनिकरित्या लाचखोरीचा आरोप करून माझे चारित्र्यहनन केले, तसेच माझ्या कर्तव्यात अडथळा निर्माण होईल, अशा प्रकारे माझ्या निष्कलंक पत्रकारितेच्या हेतूवर संशय उपस्थित करून जनमाणसात माझी प्रतिमा मलिन केली. यास्तव, या क्रमांकाचा जो कुणी आरोपी आहे, त्याच्याविरोधात माझी रितसर तक्रार असून, आपण त्याच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, ही विनंती केली आहे. हा मुद्दा केवळ एखाद्या गुपवरील निरर्थक पोस्टचा किंवा उल्लेखाचाच नाही, तर पत्रकारांच्या व्यक्तिस्वातंत्र्य व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आहे. यास्तव, आपण तातडीने कठोर कारवाई करावी, अशी विनंती केली असून सदर तक्रारी ची प्रतिलिपी

मा. देवेंद्रजी फडणवीस, गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई,मा. जिल्हा पोलिस अधीक्षक, बुलढाणा, मा. जिल्हा माहिती अधिकारी, बुलढाणा यांना देण्यात आली आहे.

# टाकळीवाडी जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थिनीकडून परंपरागत हातका सण मोठ्या उत्साहात साजरा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील जिल्हा परिषद शाळा कुमार विद्यामंदिर या शाळेतील विद्यार्थिनी कला, क्रीडा, सांस्कृतिक, परीक्षेमध्ये, अव्वल आहेत. याचबरोबर हातका सण साजरा करण्यामध्ये सुद्धा कुठे कमी नाहीत.परंपरागत हातका सण उत्साहात साजरा करण्यात आला. हातका या सणाची गाणी म्हणण्यात आली. विद्यार्थिनी आणलेल्या डब्यामध्ये वेगवेगळे खिरापती घेऊन आलेले होते. डब्यातील खिरापती ओळखण्यासाठी अनेक विद्यार्थिनी शकल्ल लढवत होते. सर्व खिरापती डबे मध्यभागी ठेवून पाटी वरती हत्ती काढून या भोवती विद्यार्थिनी हातका गाणी म्हणण्यात आली. विद्यार्थिनी आणलेले सर्व खिरापती एकमेकांना प्रसाद म्हणून सर्वांना वाटण्यात आला. सर्व विद्यार्थिनी हळदी कुंकवाचा कार्यक्रम संपन्न झाला.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# चेअरमन अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त बावी येथे ओपन बैलगाडा शर्यतीचे जंगी मैदान

## चेअरमन अभिजीत पाटील यांनी केली मैदानाची पाहणी; ओपन बैलगाडा शर्यत माढा केसरी २०२४साठी राज्यभरातून सुरु आहे नावनोंदणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त 'माढा केसरी २०२४' ओपन बैलगाडा शर्यतीचे जंगी मैदान शेटफळ कुर्डूवाडी रोड बावी तालुका माढा येथे शनिवार दिनांक ५ ऑक्टोबर २०२४ रोजी घेण्यात येणार आहे. याची तयारी पूर्ण झाली आहे. या मैदानाची पाहणी अभिजीत पाटील व विठ्ठल प्रतिष्ठानच्या सदस्यांनी केली.

अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या ओपन बैलगाडा शर्यतीत भाग घेणाऱ्या बैलगाडा मालकांसाठी मोठी पारितोषिक ठेवण्यात आली आहे. या मध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक २ लाख ११ हजार १११ रुपये, द्वितीय पारितोषिक १ लाख ५१ हजार १११ रुपये, तृतीय पारितोषिक १ लाख ११ हजार १११ रुपये, चौथे पारितोषिक ५१ हजार १११ रुपये, पाचवे पारितोषिक ४१ हजार १११ रुपये, सहावे पारितोषिक ३१ हजार १११ रुपये, सातवे पारितोषिक २१ हजार १११ रुपये असे भरघोस पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. तसेच गट विजेत्या गाडीत दोन हजार रुपये बक्षीस ठेवण्यात आले आहे ही स्पर्धा अखिल भारतीय बैलगाडी संघटना यांच्या नियमानुसार आयोजित केली आहे. या स्पर्धेसाठी आदर्श बैलगाडा मालक उपस्थित राहणार असून प्रमुख आकर्षणप्रमुख आकर्षण

श्री. मोहित (शेठ) धुमाळ (सुसगाव) श्री. राहुल (भाई) पाटील (आडवी कल्याण) श्री. सुभाष (तात्या) मांगडे (नाना पेठ) श्री. धनाजी (तात्या) शिंदे (सैदापुर) श्री. प्रदीप (नाना) पाटील (कापुस खेड) सरपंच श्री. संतोष (शेठ) मोडक (वडकणे) हे असणार आहेत. तरी या बैलगाडा शर्यतीचा थरार पाहण्यासाठी नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन अभिजीत पाटील यांच्या वतीने करण्यात आली आहे.



यावेळी डीव्हीपी मल्टीस्टेटचे चेअरमन औदुंबर महाडिक देशमुख, स्वप्निल मोरे, विठ्ठल कारखान्याचे संचालक धनाजी खरात, शुभम मोरे, दयानंद महाडिक देशमुख सतीश पडळकर, डिएम मोरे महाराज, सुरज मोरे, श्रीशेल मोरै, अमित मोरे, अमित मोरे, केदार मोरे, अजित मोरे, आदर्श मोरे, धर्मराज मोरे, विठ्ठल कारखान्याचे संचालक तुकाराम मस्के, नवनाथ नाईकनवरे, दत्तात्रय नरसाळे यासह आदी उपस्थित होते.

## थोडक्यात



### राज्यस्तरीय आरोग्य दूत पुरस्काराने राजाराम हरिबा घाटके सन्मानित

सैनिक टाकळी शिरोळ : रविवार दिनांक :-२९/०९/२०२४ सैनिक टाकळी ता.शिरोळ येथील श्री राजाराम हरीबा घाटगे यांचा राज्यस्तरीय व्यसनमुक्ती व मधुमेह मुक्ती दूत पुरस्काराने कोल्हापूर येथील सयाजी हॉटेल मध्ये झालेल्या कार्यक्रमात सन्मान करण्यात आला.यावेळी संस्थापक अध्यक्ष मा.श्री सादिक शेख,श्री सुहास पाटील, श्री आस्लम शेख,डॉ. माने सर,डॉ सागर देसाई यांच्या हस्ते पुरस्काराने गौरविण्यात आला.

### सविता पवार सेवानिवृत्त



भिवंडी/प्रतिनिधी : भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या सफाई कर्मचारी सविता शंकर पवार या सोमवारी सेवानिवृत्त झाल्या. पंचवीस वर्षाहून अधिक काळ त्या महापालिकेत सफाई कर्मचारी म्हणून सेवेत रुजू होत्या. महापालिकेच्या महासभागृहात आयोजित केलेल्या सेवानिवृत्ती कार्यक्रमाप्रसंगी मनपा उपायुक्त शैलेश दोंदे यांच्या हस्ते सत्कार करून त्यानां सन्मानित करण्यात आले. त्यानंतर कुटुंबीय व नातेवाईकांनी पवार यांचा सन्मान केला व शुभेच्छा दिल्या.

# एम.आय.टी कनिष्ठ महाविद्यालय वाखरी, पंढरपूर येथे ध्यान धारणा शिबिर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी :

वाढत्या वेगवान आणि तणावपूर्ण जगात, सजगता आणि ध्यानाचे महत्त्व जास्त सांगता येत नाही. अलीकडेच, पंढरपूरच्या वाखरी येथील एमआयटी कनिष्ठ महाविद्यालयाने रोटरी क्लब ऑफ पंढरपूर व तेज ज्ञान फाऊंडेशन च्या सहकार्याने मेडिटेशन शिबिर आयोजीत केले होते. हा कार्यक्रम प्राचार्य डॉ. स्वप्नील शेठ यांच्या नेतृत्वाखाली तसेच रोटरी क्लबचे अध्यक्ष श्री. गाणमोटे, ऍडव्होट श्री. केसकर सर, श्री. जाधव सर, आणि श्री. गडम सर यांच्यासह विदयार्थी व शिक्षक उपस्थित होते.

ध्यान हे फक्त विश्रांती चे तंत्र नसून ते आत्म-शोध आणि मानसिक संतुलनचा मार्ग आहे. हे दैनंदिन जीवनातील गोंधळ, भावनिक आरोग्य आणि कल्याण यांना प्रोत्साहन देते. तेज ज्ञान फाऊंडेशन, आध्यात्मिक आणि मानसिक उन्नतीसाठी व त्याच्या वचनबद्धतेसाठी ओळखले जाते, या सत्रात विद्यार्थ्यांना विविध तज्ञांचे मार्गदर्शन लाभले.

ध्यान सत्राची सुरुवात डॉ. स्वप्नील शेठ यांच्या प्रस्तावनेने झाली, त्यांनी शैक्षणिक यशामध्ये मानसिक निरोगीपणाचे महत्त्व पटवून सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना त्यांच्या दैनंदिन दिनचर्यामध्ये ध्यान धारणा करण्यासाठी प्रोत्साहित केले.

डॉ. शेठ यांच्या प्रेरणादायी शब्दांनंतर, रोटरी क्लब ऑफ पंढरपूरचे अध्यक्ष श्री. गाणमोटे यांनी रोटरी क्लब मार्फत घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रम व त्याला चालना देण्यासाठी सामाजिक संस्थांची भूमिका स्पष्ट केली. तेज ज्ञान फाऊंडेशनच्या अनुभवी तज्ञांच्या नेतृत्वाखाली, शांत व , सुखदायक वातावरणामध्ये सर्व शिक्षक व विद्यार्थी मग्न होऊन त्यांनी ध्यानाचा सुखद अनुभव घेतला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एम आयटी ज्युनिअर कॉलेज वाखरी पंढरपूर येथील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान स्पर्धेत बी. बी. पाटील हायस्कूल भिवंडी तालुक्यात प्रथम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील कुंरूद येथील बी. बी पाटील इंग्लिश मिडीयम हायस्कूल व ज्युनियर कॉलेजने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानाअंतर्गत स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला आहे.





निसर्गाच्या सान्निध्यात शाळेची प्रशस्त इमारत, वर्गखोल्या, दर्जेदार शिक्षण, स्वच्छता, शैक्षणिक वर्षांत प्रभावीपणे राबविण्यात येणारे शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, सामाजिक उपक्रम, दहावी, बारावी १०० टक्के निकाल शाळेच्या या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा २ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ अभियानाअंतर्गत खाजगी व्यवस्थापनाच्या शाळाममधुन तालुकास्तरावर भिवंडी ग्रामीण विभागातून बी. बी. पाटील इंग्लिश मिडीयम हायस्कूल व ज्युनियर कॉलेजची प्रथम क्रमांक म्हणून निवड झाली असुन स्पर्धेचे तिन लाख रुपयांचे बक्षीसही पटकावले आहे. प्रथम क्रमांकांची निवड होताच हायस्कूलचे संस्थापक अध्यक्ष बी. बी. पाटील मुख्याध्यापिका मोनिका मराडे, अनामिका पाटील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांनी आंनद व्यक्त करुन जल्लोष साजरा केला आहे.

# निफाड सायकलीस्टच्या वतीने म. गांधी जयंती निमित्त सायकलिंग करून अभिवादन





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

गोदा-नंदीनी रायडर्स व आदित्य स्पोर्टस्,नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने म.गांधी जयंतीचे औचित्य साधुन राष्ट्रपिता म.गांधी व लाल बहादूर शास्त्री जन्मदिवस सायकल राईड चे आयोजन केले होते. निफाड सायकलीस्टच्या सदस्यांनी सहभाग घेऊन निफाड ते लाखलगाव व परत असा पन्नास किमी पेक्षा जास्त सायकलिंग पुर्ण केले.

नासिक ते कोटमगाव राईड ची पूर्व तयारी या वेळी करण्यात आली, धुक्यात हरवलेल्या रस्त्यातून सायकल चालवणे म्हणजे स्वर्ग सुखाची अनुभूती या वेळी आली.

आदित्य स्पोर्ट्स आणि गोदा - नंदिनी ग्रुप ने सुंदर नियोजन केले होते, सर्व रायडर्स ला या वेळी मेडल प्रदान करण्यात आले. यावेळी राईडमध्ये प्रविण तनपुरे, अशोक कोल्हे, राजेंद्र गवळे, दिपक बोरसे, विक्रम डेर्ले, संदीप गवळी, संदीप काजळे, दिपक घंगाळे, ओमकार घंगाळे, अमोल जाधव यांनी सहभाग नोंदवला. राईड दरम्यान स्वच्छ भारत स्वच्छ परिसर, पाणी अडवा पाणी जिरवा, मुलगी शिकली प्रगती झाली, अवयव दान श्रेष्ठ दान, सायकल चालवा पर्यावरण वाचवा ई संदेश या प्रसंगी देण्यात आले.

# अंबरनाथ तालुका प्राथमिक शिक्षक पतपेढीची वार्षिक सभा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अंबरनाथ प्रतिनिधी/ बाळासाहेब अहिरे : येथील अंबरनाथ तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढीची २३वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवारी २८ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती. यावेळी पतसंस्थेचे संस्थापक सल्लागार माननीय आमदार किसनराव कथोरे साहेब यांनी उपस्थितांना संबोधित करत मार्गदर्शन केले. सभेच्या अध्यक्षस्थानी पतपेढी अध्यक्षा सौ. सुरेखा राऊत होत्या. अंबरनाथ तालुका प्राथमिक शिक्षक पतपेढी मर्यादित या पतसंस्थेच्या या वार्षिक सर्वसाधारण सभेत संस्थेचे सचिव श्याम माळी यांनी विषय वाचन केले. मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. अहवाल, ताळेबंद, नफा तोटा व तेरिज पत्रकास मंजुरी, नफा विभागणी मंजुरी, सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकास मंजुरी, इत्यादी ठरावांना मंजुरी देत कर्जमर्यादा ७ लाखावरून ९ लाख आणि व्याजदर ९.९६ % इत्यादी विषयांना मंजुरी देण्यात आली.





यावेळी संस्थेच्या अध्यक्षा सुरेखा राऊत यांनी पतसंस्थेच्या यांच्या कार्यावेळी सभेत... 

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा सुरेखा राऊत यांनी पतसंस्थेच्या कार्याचा लेखाजोखा उपस्थितांसमोर मांडला आणि भविष्यात सभासदांना अधिक चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न करु असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोमनाथ कानगुडे यांनी केले. नियोजन माजी सचिव आणि स्विकृत संचालक राम माळी यांनी केले. ईशस्तवन आणि स्वागतगीत जि. प. शाळा कासगावच्या विद्यार्थिनी यांनी गायले. आयत्या वेळच्या विषयांमध्ये विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे सभेचे अध्यक्ष सुरेखा राऊत आणि सुनील पाटोळे यांनी दिली. सभासदांनी सहकार्य केले. खजिनदार पांडुरंग शिर्के यांनी आभार मानले. यावेळी या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी आमदार किसनराव कथोरे साहेब, ठाणें पालघर पतपेढीचे संचालक नारायण गोल्हे, अध्यक्षा सुरेखा राऊत, सचिव श्याम माळी, उपाध्यक्ष शंकर घोडगे, खजिनदार पांडुरंग शिर्के, माजी अध्यक्ष सुनील पाटोळे, स्वाभिमान शिक्षक संघटना तालुकाध्यक्ष राणू बनसोडे, स्वाभिमानचे कुबनप अध्यक्ष प्रकाश पाटील, संचालक बळवंत शेवाळे, नारायण गोल्हे, शंकर झाडबुके, मोहन राणे, मिलिंद पवार, सोमनाथ कानगुडे, सतीश सुरवसे, वैदेही देशमुख, अनघा सोनकांबळे, स्वीकृत संचालक राम माळी तसेच केंद्रसमन्वयक जामनिक सर, सोळसे सर यांची उपस्थिती होती.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा सुरेखा राऊत यांनी पतसंस्थेच्या ... 

याप्रसंगी नवनिर्वाचित संचालक यांचा सन्मान तसेच सेवानिवृत्त सभासदांना भेटवस्तू व धनादेश देऊन सन्मान करण्यात आला. तसेच गुणवंत शिक्षक व गुणवंत पाल्य यांचा भेटवस्तू देऊन सन्मान तसेच जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा सन्मान आमदार साहेबांच्या हस्ते करण्यात आला.

सन्माननीय आमदार महोदयांनी आपल्या मनोगतात पतसंस्थेच्या कार्याचे कौतुक केले. इवलेसे लावलेले रोपटे आता वटवृक्षात रूपांतरीत होत असताना समाधान व्यक्त केले.





# तालुकास्तरावरील भालाफेक मध्ये संचित शहारे प्रथम तर तृषार बागडे द्वितीय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/ गोंदिया : तालुक्यातील नंगपुरा मुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा येथील विद्यार्थी तालुकास्तरीय भालाफेक खेळात संचित मोरेश्वर शहारे प्रथम तर तुषार कृष्णकुमार बागडे द्वितीय क्रमांक मिळविले आहे.

वयोगट सतरा या प्रकारातील मैदानी खेळ वैयक्तिक या प्रकारात भालाफेक यामध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपुरा मुर्री येथील विद्यार्थीनी पटकावला. सतत विद्यार्थी सराव करण्यासाठी मार्गदर्शक शिक्षक मुन्नाभाई नंदागवळी हे करत असतात. या यशाबद्दल सहाय्यक आयुक्त विनोद मोहतुरे, मुख्याध्यापक रविशंकर इठूले, प्रदीप ढवळे, नीता भलमे, साधना पारधी, अस्मिता तेलंग, कार्तिक शहारे, स्वाती राणा, प्रगती खोब्रागडे, अर्चना चव्हाण व तुषार महाजन यांनी अभिनंदन केले.

## सी सी. टीव्ही कॅमेरेचा शुभारंभ — तहसीलदार शिल्पाताई ठोकडे

# हाजी हशमोदीन तांबोळी चॅरिटेबल ट्रस्टचे सामाजिक काम कौतुकास्पद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

करमाळा नगर परिषदेची कै. नामदेवराव जगताप पूर्ण शाळेतील सी सी. टीव्ही कॅमेरेचा शुभारंभ करमाळा तहसील कार्यालयाचे तहसीलदार शिल्पताई ठोकडे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी कामा नगर परिषदेचे मुख्याधिकारी सचिन तपसे. नगरसेवक संजय सावंत, नगरसेवक तथा हाजी हाशमोद दिन चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष अल्ताफ शेठ, तांबोळी, माजी नगराध्यक्ष शौकत नालबंद, माजी उपनद्याक्ष प्रशांत ढाळे, केंद्र समन्वयक दयानंद चौधरी, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मजहर शेख, मुख्याध्यापक जुबेर झनवाडकर, पत्रकार नाशिक कबीर, पत्रकार अश्फाक सय्यद, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष समीर शेठ तांबोळी, करमाळा अर्बन बँकेचे माजी उपाध्यक्ष फारूक जमादार, मुजावर सर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बोलताना नगरसेवक हाजी अल्ताफ शेख तांबोळी मनाली की मुस्लिम समाजाचे अध्यक्ष हाजी उस्मान शेठ तांबोळी यांच्या मार्गदर्शनाखाली हाजी हर्ष मोदी चरिटेबल ट्रस्टच्या वतीने यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे सी. सी टीव्ही कॅमेरे बसवले तर कोविड काळात सर्वसामान्य नागरिकांना केलेली मदत असो किंवा दिवाळी समाजावेळी मिठाईचे वाटप असो रमजानच्या वेळी शिधावाटप असेच रोणांच्या सेवेसाठी रुग्णवाहिका असो चढता उपक्रम असून सर्व समाजाला घेऊन या ट्रस्टच्या माध्यमातून काम करत आहे असे ते यावेळी म्हणाले सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फरक जमादार यांनी केले.



यावेळी बोलताना तहसीलदार शिल्पाताई ठोकडे म्हणाले की, तांबोळी ट्रस्टच्या माध्यमातून उर्दू शाळेचे सीसी टीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असून याचा शहरातील विविध सामाजिक संस्थेत काम करणाऱ्यांनी आदर्श घेऊन असे सामाजिक उपक्रम राबवावे असे आव्हान केले असून या शाळेत मुलींची संख्या जास्त असल्याचा मला व्यक्तीशा आनंद झाला आहे विविध स्पर्धेत मुलींनी हे संपादन केले असून त्यांना बक्षीस वितरण करणे हे भाग्य मला लाभले असे त्यावेळी म्हणाले.

यावेळी तहसीलदार शिल्पाताई ठोकडे व मुख्याधिकारी सचिन तपासे यांच्या शुभहस्ते शाळेत विविध स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या हे शास्त्र शेख लय जा कुरेशी मुसब्बा कुरेशी एकरा मझार शेख, जोया कुरेश, हदिया जनवाडकर यांच्या ट्रॉफी व या मिडल देऊन सन्मान करण्यात आले.

या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समीर सिकंदर शेख , सोहेल पठाण, नुसती केम पठाण, समीर दाऊद शेख, आयान बिग, वजीत शेख, कादर शेख हिदार वस्ताद अफरोज पठाण मौलाना सिकंदर अमिन बेग हसीन बॅग आभार बॅग समीर वस्ताद वकील शेख, शेख आदी जणांनी परिश्रम घेतले होते.